ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 3.012(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 3 NO. 6 Nov. 2017

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of

UGC Sponsored One Day National Seminar On

## IMPACT OF GLOBALIZATION ON RURAL INDIA

21st November, 2017



*Guest Editors*

**Dr. Subhash K. Pawar**

**Mr. Vikas T. Adlok**

ORGANIZED BY

**DEPARTMENT OF SOCIOLOGY**

**LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE, NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI (MS).**

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Vol. 3 No. 6 Nov. 2017

(UGC Approved Journal No. 63716)

Impact Factor: 3.012 (IIJIF)

## SPECIAL ISSUE

UGC Sponsored One Day National Seminar On

## Impact of Globalization on Rural India

21st November, 2017

*Organized by*

**DEPARTMENT OF SOCIOLOGY**
**LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE,**
**NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI.**
*(Accredited B Grade by NAAC)*

*Guest Editors*

**Dr. Subhash K. Pawar**
**Mr. Vikas T. Adlok**

**MGEW SOCIETY'S**
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES**
**KALYAN (MAHARASHTRA)**
Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No. 63716**
**Impact Factor:** 3.012 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded amnawale@gmail.com
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taiwan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Rajivkumar Dumka,** Zarkhand.
**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Saiu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

3.

# जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. सुभाष किशनराव पवार**
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय,
नांदगाव पेठ, जि. अमरावती

**प्रस्तावना:**

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करता 'जागतिकीकरण' ही एक सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन होत आहे. जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेसाठी जागतिक व्यापारावरील निर्बंध दुर करुन देशाची अर्थव्यवस्था ही जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्म करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेत भांडवल, वस्तू, सेवा, तंत्रज्ञान व श्रम यांचा याचा जगभर मुक्त संचार होणे अभिप्रेत आहे. आर्थिक, सामाजिक, राजकिय आणि सांस्कृतिक करारांद्वारे जगातील लोक समाज व राष्ट्रे यांच्यात आंतरसंबंध निर्माण करणारी व हे संबंध वाढवणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**विषय निवड :**

जागतिकीकरण हा गेल्या काही वर्षात सर्वात जास्त चर्चेत असलेला एक ज्वलंत विषय आहे. जागतिकीकरणाच्या चांगल्या वाईट परिणांमाची भिती सुरुवातीपासून व्यक्त करण्यात आली आहे. गेल्या २५ वर्षापासून हे धोरण भारतात राबविल्यामूळे भारतीय ग्रामीण समाजावर जागतिकीकरणाचे कोणते परिणाम झाले आणि विशेषत: भारतीय लघुउद्योग, कृषीव्यवसाय, पर्यावरण, ग्रामीण सामाजिक संस्था इत्यादी वर कोणते परिणाम झाले आहे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून 'जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव एक समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयाची निवड लघु शोधनिबंधासाठी करण्यात आली आहे.

**संशोधन पध्दती :**

सदरील लघु शोधनिबंधासाठी संशोधन पध्दतीतील द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे व साप्ताहिक इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहे.

**लघु शोधनिबंधाची उद्दिष्टये**

१. जागतिकीकरणामूळे ग्रामीण सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कोणत्या प्रकारचे परिवर्तन झाले आहे याविषयी अध्ययन करणे.
२. जागतिकीकरणाचा कृषीक्षेत्रावर पडलेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
३. जागतिकीकरणामूळे लघुउद्योगाचा ऱ्हास झालेला आहे याविषयी विवेचण करणे.
४. जागतिकीकरणामूळे पर्यावरणावर पडलेल्या गंभीर परिणामांचा अभ्यास करणे.
५. जागतिकीकरणाचा आरोग्यावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

६. जागतिकीकरणामूळे स्त्रियांच्या दर्जात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

भारतात १९९१ मध्ये आर्थिक संकट उद्‌भवले होते. या आर्थिक संकटातून देशाला वाचविण्यासाठी जागतिक बॅंक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडे कर्ज मागणी केली होती. या संस्थानी भारतीय सरकारवर काही अटी लादल्या होत्या. त्या अटीनूसार भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण स्विकारले आहे. या धोरणानूसार भारत सरकारने जागतिकीकरणाची प्रक्रिया स्वीकारली आहे. गेल्या २७ वर्षात जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण समाजावर मोठया प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. जागतिकीकरणाने जीवनाच्या प्रत्येक पैलूंना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वातील लोकांमधील आणि देशातील वाढत्या परस्परावलंबनाच्या संदर्भामध्ये या विचाराने सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये परिवर्तनाच्या एका नवीन युगाची सुरवात केली आहे.

**कृषीक्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतात एकूण लोकसंख्येच्या ६९ टक्के लोक खेडयात राहतात. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आणि शेतीशी निगडीत असलेले छोटे मोठे लघु उद्योग आहेत. भारताने जागतिकीकरण धोरण स्विकारल्यामूळे बहुराष्ट्रिय कपंन्या शेतीत उतरल्या आहेत. व त्यांनी गुजरात व पंजाब सरकार बरोबर करार केल्यामूळे ते शेतक-या बरोबर कंत्राटी पध्दतीने शेती करुन लागले आहे. जागतिकीकरणानंतर शेतीच्या समस्या वाढल्या आहेत. शेतमाल बाहेरुन येवू लागला आहे. याच काळत अन्नधान्य उत्पादन वाढीचा वेग सातत्याने घटत आहे. त्यामूळे शेतक-यांच्या आत्महत्या ही घडू लागल्या आहेत. यांचे कारण भारतीय शेती, समाजातील आर्थिक व सामाजिक स्पर्धा, कृषी बाजारपेठेतील दलाल व श्रीमंत शेतक-यांचे वाढते वर्चस्व, व्याजाचे दर यांच्या वाढत्या वर्चस्वामूळे शेतकरी आत्महत्या करु लागले आहे.

**सामाजिक व सास्कृतिक क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

जागतिकीकरणामूळे विविध संस्कृती धर्म, भाषा, आचार विचार, खाद्य पदार्थ यांची मोठया प्रमाणात देवाण घेवाण सुरु झाली आहे. आयात निर्याती बरोबरच संस्कृतीचाही प्रसार होत आहे. त्यामूळे जुनी मुल्ये जावून नवीन मुल्य येत आहे. पाश्चिमात्यकरणाचे प्रमाण वाढले आहे. पोशाख पध्दती, राहणीमान, नातेसंबंध, भाषा यात वाढ होत आहे. चंगळवाद, स्त्री-पुरुष संबंधातील मनमोकळेपणा, मुल्यांचा -हास, व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक, कुटूंब संस्थेचे महत्व कमी होणे, नैतिकतेचा -हास अशा अनेक गोष्टी घडुन येत आहे. अतिरेकी व्यक्तिस्वातंत्र्यामूळे वृध्दांच्या समस्या वाढल्या आहेत. आणि जीवघेण्या स्पर्धामूळे मानसिक आजार वाढत आहे.

**लघुउद्योगावर पडलेला प्रभाव :**

जागतिकीकरणामूळे आर्थिक विषमता वाढली आहे. कारण जागतिकीकरणामूळे लहान शेतकरी, भूमिहीन मंजूर, अशिक्षित व्यक्ति यांच्या तुलनेत मोठे शेतकरी, श्रीमंत व्यापरी यांना अधिक फायदा झालेला आहे. त्यामूळे श्रीमंत लोक श्रीमंत होत आहे तर गरीब लोक अधिक गरीब होत आहे. परिणामी मुठभर लोक हे ऐषआरामाचे जीवन जगत आहे. तर बहुसंख्य लोकांना आपल्या मुलभूत गरजा भागविणे देखिल कठिण होत आहे. विकसीत देशातील अति उत्पादनामूळे विदेशी उत्पादक मोठया प्रमाणावर भारतीय बाजारपेठेत स्वस्त दरात मालाचा भडीमार करित आहे. यामूळे अनेक उद्योगधंदे बंद पडत आहेत. या कारणाने औद्योगिक क्षेत्रासाठी जागतिकीकरण हे मृत्यूघंटाच ठरणार आहे. लाखो लघुउद्योग ठप्प झाले आहेत. आणि इतर देखिल त्याच मार्गावर आहेत. त्यामूळे भारतीय औद्योगिक व लघु उद्योग क्षेत्रावर त्याचे घातक परिणाम होत आहेत. कारण विदेशी कंपन्यामूळे निर्माण होणा-या मुठभर रोजगारापेक्षा नष्ट होणारा एकूण रोजगार खुप जास्त आहे.

**पर्यावरण क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

जागतिकीकरणामूळे बहुराष्ट्रिय कंपन्या भारतात येत आहेत. त्या कपंन्यामूळे वाढते प्रदुषण व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम गंभीर स्वरुपाचा आहे. भारताची संपत्ती, जमीन वने, खनिज, पशुधन प्राणि आहे व त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे गरजेचे आहे. परंतू विशेष आर्थिक क्षेत्र मूळे या नैसर्गिक साधन संपत्तीचे अस्तित्व धोक्यात आली आहे. कारण या कंपन्यांना कच्चा माल हा जंगलातून पुरवला जातो. यामूळे पर्जन्यमान कमी होत आहे.

**आरोग्य क्षेत्रावर पडलेला प्रभाव :**

काही विचारवंताच्या मतानूसार जागतिकीकरणामूळे आरोग्य व्यवस्थेत घसरण झाली आहे. संसर्गजन्य रोग, व दारिद्रय यामूळे निर्माण झालेली रोगट मनोवृत्ती व विकृत्ती यात वाढ होताना दिसून येत आहे. मलेरिया, क्षय, महारोग यांचा प्रसार पुन्हा सुरु झालेली आहे. आरोग्य सेवांचा खाजगीकरण झाल्यामूळे गरिबांना व वंचीतांना व दलितांना आरोग्य सेवा मिळणे मुश्किल झाले आहे.

**महिलावर पडलेला प्रभाव :**

परकीय भांडवल व व्यापराचे उदात्तीकरण यांनी निर्माण केलेल्या धोक्यामूळे असंघटित क्षेत्रातील महिलांच्या रोजगार उपलब्धतेच्या संधीवर परिणाम होत आहे. शेती प्रक्रियेच्या उद्योगामध्ये स्त्रियांची संख्या खुप असते. आणि तेथे बहुराष्ट्रिय कपन्यांना प्रवेश मिळाल्यामूळे स्त्री कामगारावर परिणाम होतो. स्त्री कामगाराची संख्या जरी वाढली असली तरी रोजगाराच्या संधी असमाधानकारक आहेत. त्यांना असुरक्षिततेत व कमी वेतनावर काम करावे लागते. माध्यमाचा अतिरेकी परिणाम, त्यात जाहिरातीमधून उत्पादनाशी संबंध नसतांना स्त्री देहाचे प्रदर्शन, उपभोग्य वस्तू म्हणून सर्रास वापर, मालिका व चित्रपट यातून स्त्रीयांचा दुयम दर्जा दाखविला जात आहे.

**शोधनिबंधाचे निष्कर्ष :**

१. जागतिकीकरणमूळे शेतीची समस्या वाढली आहे. त्याचबरोबर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे.
२. जागतिकीकरणामूळे पाश्चिमात्यकरण, आधुनिकीकरणाचे प्रमाण वाढले आहे.
३. चंगळवाद संस्कृती वाढीस लागली आहे.
४. नैतिकतेचा ऱ्हास होतांना दिसून येत आहे.
५. अतिरेकी व्यक्तिस्वातंत्र्यामूळे वृध्दांच्या समस्या वाढीस लागल्या आहेत. आणि जीवघेण्या स्पर्धेमुळे मानसिक आजार वाढत आहे.
६. जागतिकीकरणमूळे ग्रामीण भागातील अनेक लघु उद्योग बंद पडत आहे.
७. जागतिकीकरणामूळे बेरोजगाराची संख्या वाढत आहे.
८. जागतिकीकरणामूळे नवीन कपंन्या भारतात आल्या .त्यामूळे प्रदुषणाचे प्रमाण वाढले आहे.
९. नैसर्गिक साधन संपत्तीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.
१०. जागतिकीकरणामूळे आरोग्य व्यवस्थेत घसरण झाली आहे.
११. असंघटित क्षेत्रातील स्त्रियांच्या रोजगार संधीवर परिणाम होत आहे.
१२. जागतिकीकरणामूळे आर्थिक विषमता वाढीस लागली आहे.

**संदर्भ सुचीः**

१. डॉ. निलम ताटके, डायमंड समाजकार्यकोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
२. प्रा. वी. आर. जोशी, डायमंड सामाजिक ज्ञानकोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे
३. नरेश भार्गव, वैश्वीकरण समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य, रावत पब्लिकेशन, जयपूर.
४. हरिकृष्ण रावत, समाजशास्त्र विश्वकोश, रावत पब्लिकेशन जयपूर. नई दिल्ली.
५. फर्नांडिस, ग्लोबलाईझेशन, बंगलोर.
६. समाजशास्त्र, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, पुणे.
७. डॉ. उज्वला वैरागडे, सामुदायिक विकास व विस्तार शिक्षण, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.
८. प्रा. रा. ज. लोटे, भारतीय सामाजिक संरचना आणि समस्या
९. साधना साप्ताहिक, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ.

❑❑❑